दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता





vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • शनिवार, दि.२५ एप्रिल २०२५ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक २३६ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Saturday 25 April 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 236 • Pages 4 • Rate 4 Rs

# सुनेत्रा पवार अन् अक्षय कर्डिलेंचा विजय निश्चित-नवनाथ बन

## उबाठा गटाच्या कार्यालयावर काँग्रेसचा झेंडा; त्यांचे विचार पसरवणे हेच आता ठाकरेंचे काम

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई | प्रतिनिधी**

निवडणूक आयोगावर कोणत्याही पक्षाचा झेंडा नाही, पण उबाठा गटाच्या कार्यालयावर काँग्रेसचा झेंडा दिसून येत आहे. उबाठा काँग्रेसची चाकरी करत आहे, त्यांची गुलामी करत आहे. उबाठा गटाच्या शिल्लक कार्यालयावर काँग्रेस झेंडा आणि तिथून काँग्रेस विचार पसरवण्याचे काम सुरू आहे, हेच उद्धव ठाकरे आणि संजय राऊतांचे धोरण झाले आहे, असे भाजप प्रवक्ते नवनाथ बन यांनी म्हटले आहे.नवनाथ बन म्हणाले की, बारामती आणि राहुरीमध्ये महायुतीचे दोन्ही उमेदवार प्रचंड बहुमताने निवडून येतील, जनता महायुतीसोबत आहे. अजित पवार यांच्या अपघातानंतर पोटनिवडणूक घेण्याची वेळ आली आहे. बारामतीकर हे सुनेत्रा पवार यांच्या पाठिशी आहेत. तिथे मविआने जे सहकार्य केले आहे त्याबद्दल त्यांचे आभार मानतो. राहुरीमध्ये जनता महायुतीच्या बाजून आहे तिथे अक्षय कर्डिले यांचा विजय निश्चित आहे.नवनाथ बन म्हणाले की, बारामतीमध्ये पवार विरुद्ध पवार सामना व्हावा ही रोहित पवार यांची इच्छा आहे. कारण ते स्वत:ला महाराष्ट्राचे स्वयंघोषित मोठे नेते समजतात. त्यांना वाटते की महाराष्ट्रात शरद पवार यांच्यानंतरचा बडा नेता मीच आहे. म्हणून प्रत्येक मुद्द्यावर ते भाष्य करत असतात. अजित पवार असल्यापासून रोहित पवार बारामती आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. २०२९ मध्येही त्यांची डाळ शिजणार नाही. बारामती अजित पवारांच्या वारसाकडेच असणार हे रोहित पवार यांनी लक्षात ठेवले पाहिजे.नवनाथ बन म्हणाले की, तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमध्ये इंडिआ आघाडीतील पक्षांचा पराभव होत असल्याने संजय राऊत यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. तिथली जनता ममता बॅनर्जी यांच्या दहशत जुगारत मतदानासाठी बाहेर पडत आहे. तिथे भाजपची सत्ता येणार आहे. म्हणून संजय राऊत हे कधी संविधान तर कधी निवडणूक आयोगावर शंका घेणार आहेत. तामिळनाडूमधील जनता स्टॅलिन यांना वैतागली आहे. तर पश्चिम बंगालमधील जनता ममता बॅनर्जी यांना वैतागली आहे. त्यामुळे यंदा तिथे भाजपचीच सत्ता येणार आहे.नवनाथ बन म्हणाले की, भाजप आसाम, पश्चिम बंगाल, तामिळनाडूची चिंता करते पण तुम्ही मात्र काँग्रेसची चिंता करायला लागले आहात. तुम्हाला तुमच्या पक्षाचे काय होईल या पेक्षा काँग्रेसचे आसाममध्ये काय होईल हे महत्त्वाचे वाटायला लागले आहे. तुम्हाला स्टॅलिन, ममता बॅनर्जीची चिंता आहे. उरणमध्ये उबाठा गट नाही त्याची चिंता करा. आदित्य ठाकरे उबाठा गटाचे कार्याध्यक्ष होणार असून त्यांना पद मिळताच राऊतांची पक्षातून हकालपट्टी होणार आहे. त्याबद्दल तुम्ही चिंता करायला हवी.



# एनसीआरटीच्या पुस्तकात मराठा साम्राज्याचा नकाशा चुकीचा-खा.बजरंग सोनवणे यांचे केंद्रीय शिक्षण मंत्र्यांना पत्र

## नकाशात बदल करून ऐतिहासिक सत्याची मोडतोड थांबवण्याची मागणी

दैनिक वादळ वार्ता

**बीड | प्रतिनिधी**

एनसीआरटीच्या इयत्ता ८ वीच्या इतिहास पुस्तकात मराठा साम्राज्याच्या नकाशात करण्यात आलेले बदल अत्यंत गंभीर असून, हा महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचा आणि देशाच्या गौरवशाली इतिहासाचा अवमान आहे. हा चुकीचा नकाशा तत्काळ दुरुस्त करून ऐतिहासिकदृष्ट्या अचूक नकाशा प्रसिद्ध करावा, अशी मागणी बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना पत्र लिहले आहे.

खा.सोनवणे यांनी पत्रात म्हटले आहे, छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्थापन केलेले मराठा साम्राज्य हा भारतीय इतिहासातील एक सुवर्णकाळ आहे. पेशव्यांच्या काळात या साम्राज्याचा विस्तार भारतीय उपखंडातील



विस्तीर्ण भागापर्यंत झाला होता. अटकेपार झेंडे फडकवणाऱ्या मराठ्यांच्या शौर्याचा इतिहास जगजाहीर आहे. मात्र, एनसीआरटीच्या नवीन पुस्तकात मराठा साम्राज्याचा विस्तार आणि प्रभाव अत्यंत कमी करून दाखवण्यात आला आहे. हा प्रकार इतिहासाची मोडतोड करणारा आणि सत्याचा अपलाप करणारा आहे. इतिहासाच्या पुस्तकातील या चुकीच्या बदलामुळे महाराष्ट्र राज्यात नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. ऐतिहासिक तथ्यांशी छेडछाड करून नव्या पिढीसमोर चुकीचा इतिहास मांडला जात असल्याची भावना जनसामान्यांमध्ये निर्माण झाली आहे. या विषयावर राज्यभरातून संताप व्यक्त होत असतानाच खा. सोनवणे यांनी थेट केंद्राकडे धाव घेत या प्रकरणाची दखल घेण्यास भाग पाडले आहे. एनसीआरटीने या नकाशात बदल का केला, याचे अधिकृत आणि स्पष्टीकरण सरकारने द्यावे, ऐतिहासिकदृष्ट्या योग्य आणि प्रमाणिक नकाशा पुन्हा पुस्तकात समाविष्ट करण्यात यावा, मराठा साम्राज्याचा गौरवशाली इतिहास कमी लेखण्याचा प्रयत्न थांबवावा आदि मागण्याही करण्यात आल्या आहेत.

**मराठा साम्राज्याचा विस्तार हा केवळ भौगोलिक नव्हता, तर तो आमच्या अस्मितेचा विषय आहे. एनसीआरटीसारख्या जबाबदार संस्थेने चुकीचा नकाशा देऊन इतिहासाशी अन्याय करू नये. शिक्षण मंत्र्यांनी या प्रकरणाची तत्काळ दखल घेऊन दुरुस्तीचे आदेश द्यावेत, अन्यथा हा विषय अधिक तीव्रतेने मांडला जाईल.**
**-खा.बजरंग सोनवणे, लोकसभा सदस्य, बीड**

# उमरग्यात बेसबॉलचा जल्लोष; दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर उत्साहात संपन्न!

दैनिक वादळ वार्ता

**उमरगा | प्रतिनिधी**

ग्रामीण भागात बेसबॉल या खेळाला नवी दिशा देण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषद हायस्कूल, उमरगा येथे दिनांक २२ व २३ एप्रिल २०२६ रोजी आयोजित दोन दिवसीय भव्य प्रशिक्षण शिबिर उत्साहात आणि दिमाखात पार पडले. या शिबिराने उमरग्यातील क्रीडा क्षेत्रात नवचैतन्य निर्माण केले.या शिबिरात जिल्हा परिषद हायस्कूल, उमरगा सोबतच श्री महात्मा बसवेश्वर विद्यालय, उमरगा व छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. तब्बल ७० हून अधिक खेळाडूंनी या प्रशिक्षणाचा लाभ घेत, मैदानावर आपली कौशल्ये सादर केली.

शिबिरादरम्यान खेळाडूंना बेसबॉलच्या मूलभूत तंत्रांसह आधुनिक आणि तंत्रशुद्ध प्रशिक्षण देण्यात आले. फलंदाजी, गोलंदाजी, क्षेत्ररक्षण यांसारख्या कौशल्यांमध्ये विद्यार्थ्यांनी विशेष प्रगती दर्शवली. राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये दमदार कामगिरी करण्यासाठी आवश्यक आत्मविश्वास आणि कौशल्य या शिबिरातून खेळाडूंमध्ये निर्माण झाले.या शिबिराचे मुख्य आकर्षण ठरले नांदेड येथील अनुभवी प्रशिक्षक बालाजी गाडेकर, ज्यांनी आपल्या प्रभावी




आणि प्रेरणादायी मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना खेळाची सखोल माहिती दिली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे शिबिराला एक वेगळीच उंची प्राप्त झाली.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा परिषद हायस्कूल, उमरगा येथील क्रीडाप्रेमी मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच शिबिराच्या यशस्वी आयोजनात जिल्हा सचिव महमदरफी शेख, धनराज तेलंग व शेख महेमद फसद नसरत यांनी उल्लेखनीय भूमिका बजावली यावेळी उमरगा तालुक्याचे ज्येष्ठ क्रीडाशिक्षक संजय कोथळीकर व मुनीर शेख यांचीही उपस्थिती लाभली, ज्यामुळे शिबिराला अधिक प्रतिष्ठा प्राप्त झाली.एकंदरीत, या प्रशिक्षण शिबिरामुळे उमरग्यात बेसबॉल खेळाबाबत नवचैतन्य निर्माण झाले असून, येथील खेळाडू भविष्यात राज्य व राष्ट्रीय स्तरावर चमकतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'महापशुधनवार्ता'चे अवलोकन

## पशुसंवर्धन विभागाच्या उपक्रमाचे कौतुक

दैनिक वादळ वार्ता

**पुणे | प्रतिनिधी**

पशुसंवर्धन विभागाचे डिजिटल ई-मासिक 'महापशुधनवार्ता' च्या 'मुख्यमंत्री पशुधन उद्योजकता योजना विशेषांका'चे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी (दि.२३) अवलोकन केले. पशुसंवर्धन विभागाच्या सचिव डॉ. रामास्वामी एन. (भा.प्र.से.) यांनी हे ई-मासिक मुख्यमंत्र्यांना भेट दिले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी या डिजिटल उपक्रमाचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी मुख्यमंत्री म्हणाले की, मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन योजनेचा लाभ तळागाळातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे. पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या या योजनांमुळे ग्रामीण महाराष्ट्राचे अर्थचक्र अधिक गतिमान होईल. ग्रामीण भागातील उद्योजकतेला चालना देण्यासाठी हे ई-मासिक एक महत्त्वाचे साधन ठरेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.), पदुम विभागाचे सहसचिव निवृत्ती मराळे, पशुसंवर्धन विभागाचे सहआयुक्त (पशुधन व नियोजन) डॉ. देवेंद्र जाधव यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

'महापशुधनवार्ता' हे मासिक डिजिटल स्वरूपात उपलब्ध



असल्याने ते राज्यातील जास्तीत जास्त पशुपालक व सुशिक्षित बेरोजगार तरुणांपर्यंत पोहोचण्यास मदत होत आहे. या विशेषांकात 'मुख्यमंत्री पशुधन उद्योजकता योजने'ची सविस्तर माहिती देण्यात आली असून, तरुणांना पशुपालनाच्या माध्यमातून स्वतःचा व्यवसाय कसा सुरू करता येईल, यावर मार्गदर्शन करण्यात आले आहे. पशुसंवर्धन विभागाच्या संकेतस्थळावर हे मासिक उपलब्ध असून, पशुपालक-शेतकरी बांधवांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# बीड जिल्ह्याचा खरीप पीक विमा योजनेत पुन्हा समावेश करा;शिवसेनेची आक्रमक मागणी

दैनिक वादळ वार्ता

**केज | प्रतिनिधी**

सततचा दुष्काळ आणि अतिवृष्टीच्या संकटात सापडलेल्या बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी खरीप २०२५ च्या पीक विमा योजनेत जिल्ह्याचा पुन्हा समावेश करावा, अशी मागणी शिवसेनेच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात केज तालुका प्रमुख पृथ्वीराज (अण्णासाहेब) सुरेश तात्या पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्र्यांना उद्देशून लिहिलेले निवेदन तहसीलदार कार्यालयाला देण्यात आले.

**नैसर्गिक आपत्तीचा मोठा फटका**

निवेदनात नमूद केल्या नुसार,मराठवाडा आणि विशेषतः बीड जिल्हा हा नेहमीच निसर्गाच्या लहरीपणाचा सामना करत असतो.गेल्या खरीप २०२५ हंगामात जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी आणि महापूर आले होते. यामध्ये शेतकऱ्यांची उभी पिके वाहून गेली,ज्यामुळे अतोनात नुकसान झाले आहे.अशा गंभीर परिस्थितीत बीड जिल्ह्याला पीक विमा योजनेतून वगळल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे.

**शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्याची गरज**

ओला दुष्काळ आणि कोरडा दुष्काळ या दुष्ट चक्रात अडकलेल्या बीडच्या शेतकऱ्याला आर्थिक आधाराची नितांत गरज आहे.पिके वाहून गेल्यामुळे शेतकरी राजा मोठ्या अडचणीत सापडला असून,



सरकारने तातडीने हस्तक्षेप करावा अशी मागणी शिवसेनेतर्फे करण्यात आली आहे.

**निवेदनातील प्रमुख मागण्या**-खरीप २०२५ पीक विमा योजनेतून वगळलेल्या बीड जिल्ह्याचा या योजनेत तातडीने पुन्हा समावेश करावा.संबंधित विभागाला यावर कार्यवाही करण्याचे आदेश देऊन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून द्यावी. यावेळी शिवसेनेचे स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरकारने या मागणीचा गांभीर्याने विचार करून शेतकऱ्यांना अडचणीतून बाहेर काढावे,अशी आमची नम्र विनंती आहे,असे प्रतिपादन पृथ्वीराज पाटील यांनी यावेळी केले.शिवसेनेच्या या निवेदनावर यांच्या स्वाक्षरी आहेत. दादासाहेब ससाणे विधानसभा प्रमुख, दत्तकुमार आश्रुबा काकडे(युवासेना तालुका प्रमुख) महेंद्र पुंडलिक चाटे(उपतालुका प्रमुख) विकास कारभारी काशिद (तालुका सचिव) प्रकाश मुंडे,योगेश देशमुख,सुग्रीव बसवर, प्रकाश रोमन,विश्वास जाधव,उमेश चाळक, गोपाळ आश्रुबा शिंदे, विकास सुरेश गालफाडे माणिक शंकर गालफाडे, सुनील अर्जुन जावळे, रफिक शेख यांच्या स्वाक्षरी आहेत.

# संपादकीय

## दशकानंतरचं जग

माणसाला सर्वात हवीशी वाटणारी आणि अत्यावश्यक असलेली एक बाब नाहीशी होण्याच्या मार्गावर आहे. ती म्हणजे व्यक्तिगत गुप्तता उर्फ 'प्रायव्हसी'! तसे पाहिले तर ती आताच हाताबाहेर जात आहे. दुकानांमध्ये, रस्त्यावर कॅमेरे असतातच. शिवाय संगणकांमध्ये, हँडसेटमध्ये, गाडीमध्ये 'जीपीएस' असते. पण स्मृतिभ्रंशासारख्या रोगांचे प्रमाणदेखील वाढत असल्याने आपले काय हरवले आहे, तेच बहुधा आपण विसरून जाऊ!माझ्याकडे १८८० मधले एक दुर्मीळ पुस्तक आहे!' एखादा संग्राहक अभिमानाने सांगतो. आपल्यालाही त्याचे कौतुक वाटते, कारण इतकी जुनी वस्तू त्याने जीवापाड जपलेली असते आणि पुढच्या पिढ्यांना ऐतिहासिक संदर्भ म्हणून तिचा (कदाचित) उपयोग होणार असतो... 'कदाचित' असे म्हटले कारण चक्रावणाऱ्या वेगाने तांत्रिक प्रगती होण्याच्या या दिवसांमध्ये बदलती जीवनशैली आणि संकल्पनांमध्ये कोण जाणे किती व्यक्तींना अशा संग्राहकांचे आणि त्यांच्याकडे असलेल्या वस्तूंचे महत्त्व वाटेल! हे झाले वस्तूंचे उदाहरण. तंत्रज्ञानातील बदलांसोबत संबंधित उपकरणांचे दृश्य रूप आणि कार्यपद्धतीदेखील किती आणि कशी बदलते पाहा. तसेच होणारे सर्वच बदल चांगलेच असतील असेही नाही; परंतु त्या दिशेने प्रवास सुरू आहे हे नक्की!२०३५ पर्यंतच्या अत्याधुनिक काळात सर्वात आधी बळी पडणार आहे टपाल आणि तार खात्याचा म्हणजेच पोस्टाचा. गंमत पाहा, फक्त दहा-पंधरा वर्षांपूर्वी हे विधान अतिशयोक्तीपूर्ण वाटले असते. कारण शहरी भाग वगळला तरी खेड्यापाड्यांमधील लोक तोपर्यंत संवादाच्या विविध माध्यमांसाठी पोस्टावर अवलंबून असत; परंतु मोबाइल फोनच्या क्रांतीने हे भाकीत पार उलटे करून टाकले. शिवाय येणारा जमाना तत्काळ उर्फ 'इंस्टंट'चा आहे. मोबाइल फोन, संगणक, इंटरनेटच्या वापराने लगेचच संभाषण आणि संदेशवहन होत असताना उशिराने मिळणाऱ्या टपालसेवेवर कोण अवलंबून राहील? तसेच तंत्रज्ञानाबरोबरच खासगी कुरियर सेवेने टपाल खात्याचा महसूल बऱ्यापैकी खाल्ला आहे. ही सेवा चालवणे सरकारला दिवसागणिक न परवडणारे होत चालले आहे, हे तर आपण पाहतोच आहोत. खरे तर, हळूहळू का होईना, पोस्ट ऑफिसचे रूपांतर बँकेमध्ये होऊ लागले आहे. बँकेवरून आठवले, चेकदेखील पोस्टाच्याच वाटेने जात आहे, हे वाचून बहुतेकांना आश्चर्य वाटेल; पण ते खरे आहे. चेकवरील प्रशासकीय प्रक्रिया करण्यामागचा खर्च अनेक बँका आणि वित्तसंस्थांना दिवसेंदिवस न पेलवणारा होत आहे. खुद्द ग्रेट ब्रिटनमध्ये २०२८ पर्यंत धनादेशाला त्याच्या सिंहासनावरून पायउतार करण्याबाबतची योजना कार्यान्वित झाली आहे. 'प्लास्टिक मनी' म्हणजेच विविध क्रेडिट-डेबिट-प्रीपेड कार्डे, फोन बँकिंग आणि इंटरनेट याद्वारे होणाऱ्या आर्थिक व्यवहारांची संख्या जगभर विलक्षण वेगाने वाढत असल्याचाही हा परिणाम आहे.या यादीमध्ये पुढचे नाव आहे वृत्तपत्रांचे. वाचक म्हणतील आता हे फारच झाले, आपल्याकडे असे होणे शक्यच नाही. शिवाय गरम चहाचे घुटके घेत पेपर वाचण्याची मजा कोण सोडेल? हे घडून येण्यासाठी कदाचित जरा वेळ लागेल (भारतामध्ये २०३५ पर्यंत वृत्तपत्रांचा खप उतरणीला लागलेला असेल असा काहीजणांचा अंदाज आहे.) पण जागतिक पातळीवरचा कल तसा आहे खरा. जगभरातील अनेक युवक-युवतींनी दररोजचे वृत्तपत्र विकत घेणे बंद केले आहे. (अर्थात आपल्याकडच्या तुलनेने बाहेरच्या देशांमध्ये वृत्तपत्रे खूपच महाग असतात हेदेखील तितकेच खरे.) त्यांचे म्हणणे बातम्या काय, इंटरनेट, रेडिओ किंवा मोबाइल फोनवर मिळतातच. शिवाय वृत्तपत्रांच्या मालकांनीही हे वारे ओळखून ई-आवृत्त्या सुरू केल्या आहेतच. त्यावर जास्त तत्परतेने ताज्या बातम्या कळण्याची शक्यता असल्याने त्या लोकप्रिय होत आहेत. छापील वृत्तपत्रांकडून आपला विषय पुस्तकांकडे जाणे नैसर्गिक आणि अपरिहार्य आहे, नाही का? वैयक्तिक तसेच सार्वजनिक पातळीवरचे छापील पुस्तकांचे साम्राज्य प्रचंड असले तरी त्याला दोन अंगभूत मर्यादा आहेत. पुस्तकांचे वजन आणि त्यांना लागणारी जागा. शिवाय देखभाल आहेच. दोन-तीन हजार पुस्तके सहज घरी बाळगणाऱ्या खऱ्या पुस्तकप्रेमींना या अडचणींचा चांगलाच अनुभव असतो. तसेच नव्या पिढीचे वाचन एकंदरीतच कमी झाले आहे, असेही दिसते. त्यामागची कारणे काहीही असोत.बरे, आजकाल पुस्तके ऑनलाइन खरेदी करता येतात. 'अमेझॉन'वर मिळणाऱ्या 'किंडल' सारख्या इलेक्ट्रॉनिक साधनामध्ये हजारो पुस्तके मावतात. अशी साधने स्वतःच्या बॅटरीवर सात-आठ दिवसदेखील चालतात. कुठेही बसून कितीही वाचा! बोटांना पाने उलटण्याऐवजी 'पेज डाउन'चे बटन दाबण्याची सवय लागली की झाले! दूरध्वनीच्या लँडलाइन जोडणीबाबत मात्र कोणाचे दुमत असेल, असे वाटत नाही. जगात तर सोडाच, भारतातदेखील अनेक कुटुंबांमध्ये मुले लहान असल्याने अशांनी लँडलाइन जवळजवळ नाइलाजानेच सांभाळली आहे. काहींनी तर कित्येक वर्षांची दोन पिढ्यांची सवय आहे म्हणूनच बहुधा लँडलाइन ठेवली असावी. मोबाइल फोनच्या सेवेतील तांत्रिक प्रगती, 'नंबर पोर्टेबिलिटी' अशा सुविधांमुळे लँडलाइनचे अस्तित्वच धोक्यात येणार हे उघड दिसते आहे.संगीत अर्थातच नष्ट होणार नाही; परंतु त्याच्या उपलब्धतेचे मार्ग आणि पद्धती बदलतील. खरे तर संगीत उद्योगातील फायदा दिवसेंदिवस कमी होत आहे. पायरसी उर्फ अनधिकृत वापर आणि वितरण, हे त्यामागील एक मोठे कारण आहेच; परंतु (जरा वादाचा मुद्दा असलेली) आणखी एक गंभीर बाबदेखील यात समाविष्ट आहे. संगीतातील सर्जनशीलता, उत्स्फूर्तता आणि नवनिर्मिती कमी होत आहे. सध्याच्या 'रीमिक्स'च्या संख्येवरून हे सहज समजून येईल. शिवाय फाइल शेअरिंग आणि सुलभ डाउनलोडिंगच्या तंत्रामुळे 'सीडी'च्या जमान्यात भरपूर व्यवसाय करणारा संगीतउद्योग, आता आर्थिकदृष्ट्या मेटाकुटीला आला आहे.इंटरनेटमार्फत मिळणाऱ्या सुविधा आणि त्यांचा प्रसार अनंत असल्याने रेकॉर्ड्स, कॅसेट आणि सीडी असा प्रवास करून आलेला संगीत उद्योग- त्याने स्वतःचीच भविष्यकालीन धोरणे तपासून न पाहिल्याने सध्या तरी जरा गोंधळलेल्या अवस्थेत आहे. याबाबत 'रोलिंग स्टोन्स' या जगप्रसिद्ध वाद्यवृंदाशी संबंधित असलेल्या स्टीव्ह नॉपरने एक पुस्तकही लिहिले आहे. आपल्याकडे दूरचित्रवाणीच्या विविध वाहिन्या, डीटीएच आदींचे प्रस्थ सध्या वाढत असले तरी जागतिक पातळीवर पारंपरिक अर्थाने टीव्ही पाहणे कमी होत आहे. याची कारणे दोन. एक तर 'लाइव्ह स्ट्रीमिंग' सारख्या तंत्रांमुळे संगणकावर तसेच सेलफोनमार्फत थेट टीव्ही उपलब्ध होण्याचे प्रमाण आणि वेग वाढतो आहे. तसेच कॉम्प्युटर गेम्ससारखे करमणुकीचे इतर प्रकारही संगणकावर मिळत असल्याने त्यापासून दूर जाऊन वेगळे माध्यम वापरण्याची गरज कमी होत आहे. 'नेटफ्लिक्स'सारख्या सुविधेमुळे प्रेक्षकाला काय पाहावे, याबाबतचे निर्णयस्वातंत्र्य मिळू लागले आहे. शिवाय टीव्हीवरील वाढत्या जाहिरातींमुळे मूळ कार्यक्रमाचा एकंदर कालावधी वाढत चालला आहे. बरे, जाहिराती न दाखवण्याने वाहिन्यांची पंचाईत होते. कारण प्रक्षेपणाचा वाढता खर्च. असे हे दुष्टचक्र किती काळ नीट चालते ते पहायचे!आता आपल्या ध्यानात आले असेल, की भविष्यात संगणक वा तत्सम सुविधा खरेदी करण्याची किंवा सीडीवरचे सॉफ्टवेअर, पुस्तके वा संगीत जवळ बाळगण्याची कदाचित गरजच भसणार नाही. विशिष्ट सेवाशुल्क देऊन आपण क्लाउडमध्ये मिळणारी सर्व पूरक साधने आणि उपकरणे वापरू शकू. कोणत्याही लॅपटॉप वा हँडसेटमार्फत आपण महाजालात 'ठेवलेल्या' आपल्या वस्तूंपर्यंत 'पोहोचू' शकू

# संजय गायकवाड यांचे वादग्रस्त विधान: 'शिवाजी कोण होता' पुस्तकाच्या प्रकाशकाला शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

शिवसेना (शिंदे गट)चे बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित 'शिवाजी कोण होता' या पुस्तकाच्या शीर्षकावर आक्षेप घेत प्रकाशक प्रशांत आंबी यांना फोनवरून अश्लील शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. व्हायरल झालेल्या ऑडिओ क्लिपमध्ये गायकवाड यांची अभद्र भाषा स्पष्ट ऐकू येत आहे.

या संभाषणात आमदार गायकवाड म्हणाले, शिवाजी महाराजांना एकेरी बोलणारा गोविंद पानसरे कोण? त्याला भेटायला वर जायचंय का? ... तुझी जीभ छाटून टाकीन, घरात घुसून मारेल... अशा शिवराळ शब्दांत त्यांनी प्रकाशकाला धमकावले.

२१ एप्रिल २०२६ रोजी बुलढाण्यातील एका लग्न समारंभात प्रकाशक प्रशांत आंबी यांनी हे पुस्तक वाटले. गायकवाड यांच्या पत्नीला हे पुस्तक भेट मिळाल्यावर त्यांनी रात्री उशिरा प्रकाशकाला फोन केला. पुस्तकातील छत्रपती शिवाजी महाराजांचा 'एकेरी उल्लेख' (शिवाजी कोण होता) यावर त्यांचा तीव्र आक्षेप होता. त्यांनी पुस्तक प्रकाशित करण्याचे धाडस कसे केले, असा सवाल करत अभद्र भाषेचा वापर केला. प्रकाशक प्रशांत आंबी यांनी संयम राखत गायकवाड यांच्याशी संवाद साधला. मात्र, आमदारांच्या धमकीमुळे त्यांनी पोलिसांत तक्रार दाखल करण्याची तयारी सुरू केली आहे. या घटनेने महाराष्ट्रात मोठी खळबळ उडवली असून, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर हल्ला




असल्याची टीका होत आहे.

**मेधा पानसरे यांचा सडेतोड प्रत्युत्तर**

या वादावर कॉम्रेड गोविंद पानसरे यांची सून मेधा पानसरे यांनी गुरुवारी कोल्हापूर येथे माध्यमांशी बोलताना तीव्र निषेध व्यक्त केला. त्यांनी म्हटले, आमदार संजय गायकवाड यांनी ज्या पद्धतीची भाषा वापरली आहे, त्याचा मी तीव्र निषेध करते. छत्रपती शिवाजी महाराज हे सौजन्यशील, न्यायप्रिय आणि रयतेचा राजा म्हणून ओळखले जातात. त्यांचा वारसा सांगत अशी भाषा करणारे शिवरायांचा कोणता वारसा पुढे नेत आहेत?

मेधा पानसरे यांनी पुढे सांगितले की, हे पुस्तक १९८० च्या दशकात प्रकाशित झाले असून, लाखो प्रती वाटल्या गेल्या आहेत. कॉम्रेड पानसरे यांचा विचार मारता येत नाही. त्यांच्यापाशी दुसरा तुल्यबल विचार नाही, म्हणून अशा पद्धतीचे वक्तव्य केले जाते. गायकवाड यांनी पुस्तक वाचावे, मग वक्तव्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

त्यांनी पुस्तकाच्या अधिक प्रती छापण्याची घोषणा करत गायकवाड यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणीही केली. आम्ही वकिलांचा सल्ला घेत आहोत, असे त्यांनी स्पष्ट केले. हा वाद पुन्हा एकदा 'शिवाजी कोण होता' पुस्तकाभोवतालचा दीर्घकाळ चालत असलेला वाद पुन्हा तापवणारा ठरला आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात अभद्र भाषा आणि धमक्यांचा मुद्दा चर्चेत आला आहे.

# रिपब्लिकन सेनेचे प्रकाश खंडागळे यांचा शेकडो कार्यकर्त्यांसह रामदास आठवले यांच्या रिपब्लिकन पक्षात जाहीर प्रवेश

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

गटबाजी संपवून एकसंघ रिपब्लिकन पक्ष उभारण्याच्या केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या आवाहनाला मोठा प्रतिसाद मिळत आहे. रिपब्लिकन सेनेचे मुंबई प्रदेश अध्यक्ष प्रकाश खंडागळे यांनी आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह आठवले यांच्या नेतृत्वातील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) या पक्षात जाहीर प्रवेश केला.रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी यावेळी अधिकृत घोषणा करत खंडागळे व त्यांच्या समर्थकांचे स्वागत केले.

आठवले म्हणाले, महाराष्ट्रात रिपब्लिकन पक्षाचे अनेक गट आहेत, पण देशभरात २८ राज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेशांत मी एकसंघ रिपब्लिकन पक्ष पोहोचवला आहे. नवे गट काढण्यापेक्षा विद्यमान छोटे-मोठे गट विलीन करून एक मजबूत पक्ष उभा करावा, असा आवाहन करताच महाराष्ट्रातून चांगला प्रतिसाद मिळत आहे.यापूर्वी महाराष्ट्र पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष मिलिंद सुर्वे यांनीही आपला गट आठवले यांच्या पक्षात विलीन केला होता. आठवले यांनी विश्वास व्यक्त केला की, राज्यातील अनेक छोट्या रिपब्लिकन संघटना लवकरच एकसंघतेच्या हेतूने पक्षात



सामील होतील.

प्रकाश खंडागळे यांनी प्रवेशावेळी सांगितले, वेगळा नवीन गट काढून गटबाजी वाढवण्यापेक्षा रामदास आठवले यांच्या नेतृत्वावर पूर्ण विश्वास ठेवून रिपब्लिकन पक्षात प्रवेश करत आहोत. एकसंघ रिपब्लिकन पक्ष मजबूत व्हावा हाच उद्देश आहे.

यावेळी रिपब्लिकन पक्षाचे मुंबई प्रदेश अध्यक्ष सिध्दार्थ कासारे, राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर, राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे, युवक आघाडी महाराष्ट्र अध्यक्ष पप्पू कागदे, राष्ट्रीय उपाध्यक्ष काकासाहेब खांबलकर, मुंबई कार्याध्यक्ष बाळासाहेब गरुड, मुंबई सरचिटणीस विवेक पवार, जिल्हा अध्यक्ष प्रकाश जाधव, दयाळ बहादुर आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमात महिलांचाही मोठा सहभाग होता. ज्योती यादव, निविदीता शेलार, पुष्पा भल्लाल, रोहिणी शिरपूरकर, नंदिनी शेलार, वंदना जाधव, स्मिता गौरव, रजनी विश्वकर्मा, दिव्या बल्लाळ, आशा कसबे, छाया पगारे, रोशनी पाठक, रागिणी संगारे आदी महिलांनीही पक्षात प्रवेश केला.

# नवी मुंबईत न्यूईरा हॉस्पिटलच्या आधुनिक ट्रॉमा केअर सेंटरचा शुभारंभ

## रस्ते सुरक्षेला चालना देण्यासाठी हॉस्पिटलतर्फे नवी मुंबई पोलिसांना २०० बॅरीकेट्सचे वितरण

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

रस्ते अपघातातील जखमींवर गोल्डन अवरमध्ये प्राण वाचविणारी उपचार यंत्रणा म्हणजेच ट्रॉमा केअर सेंटरच्या हे रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी खूप गरजेची आहे. ही बाब लक्षात घेता वाशीच्या न्यूईरा हॉस्पिटलने नव्याने एक पॉली ट्रॉमा केअर सेंटर सुरू केले आहे. उपचारासाठी होणारा विलंब कमी करण्यासाठी आणि त्वरित उपचार मिळवून देण्यासाठी हे केंद्र सज्ज असून यामुळे रुग्णांना योग्य वेळी योग्य उपचार मिळण्यास मदत होते.

सेंटरच्या शुभारंभ प्रसंगी श्री. संजय येनपुरे - आयपीएस, सह पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी डॉ. संजय धार (संचालक, ऑर्थोपेडिक्स विभाग),डॉ. विनोद विज (प्लास्टिक आणि कॉस्मेटिक सर्जन),डॉ. सुनील कुट्टी( न्युरोसर्जन),डॉ. चंद्रशेखर टी(क्रिटिकल केअर मेडिसिन),डॉ. मनीष पेंडसे (फिजिशियन आणि डायबेटोलॉजिस्ट),डॉ. निशांत तावडे(इंटरनल मेडिसिन एक्स्पर्ट),डॉ. राम खरे(जीआय, लॅप्रोस्कोपिक आणि रोबोटिक सर्जरी),न्यूईरा हॉस्पिटलचे उपाध्यक्ष आणि सीईओ डॉ. माताप्रसाद बी गुप्ता उपस्थित होते.

याठिकाणी ढीळरसश (ट्रायज) ही आपत्कालीन स्थितीत रुग्णांच्या स्थितीचे गांभीर्य ओळखून त्यांना प्राधान्यक्रमाने उपचार देण्याची वैद्यकीय प्रक्रिया उपलब्ध करुन देण्यात आली आहे. अपघात, स्ट्रोक, गंभीर दुखापतींसारख्या प्रकरणांमधील रुग्णाला सर्वात आधी प्राधान्य दिले जाते आणि प्रतीक्षा न




करता त्यांचे व्यवस्थापन केले जाते. या केंद्राला चोवीस तास उपलब्ध असलेल्या प्रशिक्षित आपत्कालीन पथकाचे, तसेच अस्थिरोग, सर्जन, मज्जासंस्थेच्या शस्त्रक्रिया, भूलविकार तज्ज्ञ, अतिदक्षता विभाग आणि फिजिओथेरपी तज्ञांचा समावेश आहे.

शहरातील वाढत्या वाहतूक व्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर रस्ते सुरक्षेला चालना देण्यासाठी न्यूईरा हॉस्पिटलतर्फे नवी मुंबई पोलिसांना २०० बॅरीकेट्स देण्यात आले.वाशी पोलीस ठाण्यात आयोजित कार्यक्रमात वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चांदेकर यांच्या उपस्थितीत हे बॅरीकेट्स सुपूर्द करण्यात आले. यावेळी संबंधित अधिकारी व रुग्णालयाचे प्रतिनिधी उपस्थित होते. वाहतूक नियंत्रण अधिक प्रभावी करण्यासाठी आणि रस्त्यांवरील शिस्त राखण्यासाठी या बॅरीकेट्सचा उपयोग केला दाणार आहे.

डॉ. सुनील कुट्टी (संचालक, न्यूरोसर्जन- ब्रेन ण्ड स्पाईन, न्युईरा हॉस्पिटल) म्हणाले, आपत्कालीन परिस्थितीत, रुग्ण आणि त्यांचे कुटुंबीय बऱ्याचदा अतिशय तणावाखाली असतात. अशावेळी वेळ व दवडता उपचार त्वरित सुरू व्हावेत आणि ते सुरळीतपणे दिले जावेत, हे सुनिश्चित करणे हा आमचा मुख्य उद्देश आहे.

न्यूईरा हॉस्पिटलचे उपाध्यक्ष आणि सीईओ डॉ. माताप्रसाद बी गुप्ता म्हणाले, आणीबाणीच्या प्रसंगी रुग्णांसाठी एक विश्वासार्ह आधार व्यवस्था निर्माण करण्यास आम्ही सज्ज आहोत. याठिकाणी रुग्णांना कोणत्याही गोल्डन अवरमध्ये उपचार मिळतील. हे 'ट्रॉमा केअर सेंटर' रुग्णांना दिलासा,पुरेपुर आराम, सुरक्षितता आणि आजारातून लवकर बरे करण्याची शाश्वती देते.

# अदानी डहाणू थर्मल पॉवर स्टेशनकडून आगवण शिशुपाडा येथील जि.प.शाळेला नवीन इमारतीचे हस्तांतरण

**दैनिक वादळ वार्ता**
**पालघर । प्रतिनिधी**

अदानी डहाणू थर्मल पॉवर स्टेशन (ADTPS) ने अदानी फाउंडेशनच्या सहकार्याने समावेशक व गुणवत्तापूर्ण शिक्षणाबाबतची आपली बांधिलकी अधोरेखित करत आगवण-शिशुपाडा येथील जिल्हा परिषद शाळेला नव्याने बांधलेली शाळा इमारत शाळा व्यवस्थापन समिती व शाळेच्या मुख्याध्यापकांकडे औपचारिकरीत्या सुपूर्द केली. हा उपक्रम ADTPS च्या सुरू असलेल्या कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR) उपक्रमांचा एक भाग असून, शिक्षण, सामुदायिक आरोग्य, ग्रामीण पायाभूत सुविधा विकास, शाश्वत उपजीविका आणि हवामान बदलावर कृती या क्षेत्रांत दीर्घकालीन सामाजिक परिणाम साधण्याचा उद्देश आहे.आगवण-शिशुपाडा येथील जि. प. शाळेमध्ये अपुऱ्या जागेमुळे दोन तुकड्या एका वर्गखोलीत चालवल्या जात असल्याने अतिरिक्त वर्गखोल्यांची गरज असल्याचे शाळा व्यवस्थापन




समिती व ग्रामपंचायत आगवण यांच्या माध्यमातून ADTPS च्या निदर्शनास आणून देण्यात आले होते. यावर तत्काळ प्रतिसाद देत ADTPS च्या CSR पथकाने सविस्तर गरज मूल्यांकन करून प्रकल्प प्रस्ताव अदानी फाउंडेशनकडे सादर केला.अनुकूल शैक्षणिक वातावरणाचे महत्त्व लक्षात घेऊन अदानी फाउंडेशनने हा प्रकल्प मंजूर केला. आवश्यक गुणवत्ता निकषांचे पालन करत दोन सुसज्ज वर्गखोल्या व एक बहुउद्देशीय सभागृह असलेली नवीन शाळा इमारत उभारण्यात आली. १५ एप्रिल २०२६ रोजी आयोजित हस्तांतरण समारंभात शाळा प्रशासन, स्थानिक प्रतिनिधी, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी अदानी डहाणू थर्मल पॉवर स्टेशनचे चीफ बिझनेस ऑफिसर हरीश पांडे यांच्या हस्ते शाळा इमारतीचे औपचारिक हस्तांतरण करण्यात आले.

यावेळी बोलताना -ADTPS च्या प्रवक्त्यांनी सांगितले,

शिक्षण हा दीर्घकालीन सामाजिक विकासाचा पाया आहे. स्थानिक समुदायांमधील शाळांच्या पायाभूत सुविधांना बळकटी देऊन विद्यार्थ्यांना उत्तम शिक्षणाचे वातावरण आणि उज्ज्वल भविष्यासाठी अधिक संधी उपलब्ध करून देणे हा आमचा प्रयत्न आहे.नवीन इमारतीमुळे अध्यापनाची गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षण परिणामांमध्ये सुधारणा होईल, असा विश्वास शिक्षकांनी व्यक्त केला. विद्यार्थ्यांनीही या उपक्रमाबद्दल आनंद व्यक्त करत अदानी डहाणू थर्मल पॉवर स्टेशन व अदानी फाउंडेशनचे आभार मानले.अशा उपक्रमांद्वारे ADTPSव अदानी फाउंडेशन स्थानिक समुदायांसोबत भागीदारी करत तळागाळातील शिक्षण बळकट करण्यासोबतच प्रदेशाच्या शाश्वत विकासाला चालना देत आहेत.

# माजलगावची ‘रील्स स्टार’ आता उद्योजिका ‘अमृता कलेक्शन’ चा भव्य उद्घाटन सोहळा संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव । प्रतिनिधी**

जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर सोशल मीडियाच्या माध्यमातून स्वतःची ओळख निर्माण करणाऱ्या माजलगाव येथील प्रसिद्ध रील स्टार अमृता अमर गरड यांच्या 'अमृता कलेक्शन' या साडी दालनाचा भव्य उद्घाटन सोहळा नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला.अमृता गरड यांनी कोणत्याही मोठ्या पाठबळाशिवाय केवळ स्वतःच्या कौशल्यावर आणि विश्वासावर इन्स्टाग्राम या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर आपल्या प्रवासाची सुरुवात केली होती. आज त्यांचे इन्स्टाग्रामवर १ लाखांहून अधिक फॉलोअर्स आहेत. सोशल मीडियावरील या यशाचे रूपांतर आता त्यांनी एका व्यवसायात केले असून, माजलगाव शहरात 'अमृता कलेक्शन'च्या रूपाने त्यांनी महिलांसाठी साड्यांचे एक दर्जेदार केंद्र सुरू केले आहे.बुधवार, दिनांक २२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १२ वाजता हा उद्घाटन सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने सौ.ऐश्वर्या जयसिंग सोळंके, सौ.रेश्मा दीपक मेंडके, सौ.रुपाली शरदराव कचरे, सौ.शिला शिरीषराव सोळंके, सौ.सुजाता विजय शिंदे आदी महिलांची उपस्थिती होती.

या मान्यवरांच्या शुभहस्ते फित कापून दालनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अमृता गरड यांच्या जिद्दीचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या उद्घाटन सोहळ्याला माजलगाव शहर व परिसरातील महिलांनी मोठी गर्दी केली होती. सोशल मीडियाच्या माध्यमातून घराघरात पोहोचलेली आपली लाडकी रील स्टार आता उद्योजिका झाली आहे, याचा आम्हाला अभिमान आहे, अशा भावना यावेळी उपस्थित ग्राहकांनी व्यक्त केल्या.



### यशाचे श्रेय परिवाराला

माझ्या या वाटचालीसाठी माझे पती अमर गरड यांनी माझ्यावर ठेवलेला विश्वास आणि पतीसह माझ्या परिवाराचे सहकार्य, तसेच माझ्यावर प्रेम करणाऱ्या माझ्या इन्स्टाग्राम परिवारामुळे हे यश मी साध्य करू शकले.
– अमृता अमर गरड (उद्योजिका व रील स्टार)

## लोकनेते सुंदररावजी सोळंके साखर कारखान्याच्या उसतोड व वाहतूक करार प्रक्रियेस प्रारंभ

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव । प्रतिनिधी**

लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याच्या आगामी हंगाम २०२६-२७ गळीत हंगामासाठी उस तोडणी व वाहतूक यंत्रणेच्या करार प्रक्रियेचा शुभारंभ दि.१९ एप्रिल, २०२६ रोजी अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर उत्साहात करण्यात आला. संचालक आबासाहेबजी गायकवाड,कार्यकारी संचालक आर.सी. बडगुजर यांच्या हस्ते हा कार्यक्रम पार पडला.



तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याचा आगामी सन २०२६ड२७ च्या ऊस गळीत हंगामाचा ऊसतोड व वाहतुक कराराचा शुभारंभ अक्षयतृतीयाच्या शुभमुहूर्तावर करण्यात आला. यावेळी कार्यकारी संचालक आर.सी. बडगुजर यांनी सांगितले की, जेष्ठ संचालक तथा माजी मंत्री आ. प्रकाशदादा सोळंके,जेष्ठ मार्गदर्शक धैर्यशील काका सोळंके, चेअरमन श्री. विरेंद्र सोळंके, व्हा. चेअरमन जयसिंग सोळंके व संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाखाली वेळोवेळीचे हंगाम यशस्वीरित्या पूर्ण झाले आहेत. यंदाच्या हंगामासाठी कार्यक्षेत्रातील सुमारे १२६१७ हेक्टर क्षेत्रावर उस पिक उभे असून,त्याची नोंद कारखान्याकडे झाली आहे.

कारखान्याने या हंगामासाठी १० लाख मे.टन उस गळीताचे उद्दिष्ट ठेवले आहे. तोडणी वाहतूक व्यवस्थेसाठी सुमारे २०० ट्रक/ट्रॅक्टर, १०० मिनी ट्रॅक्टर, ३५० बैलगाड्या आणि ३५ आधुनिक उस तोडणी यंत्रे यांचे करार करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच मशीनरी दुरुस्ती व ओव्हरहॉलिंगची कामेही वेगाने पूर्ण करण्यात येत आहेत. करार प्रक्रिया पूर्ण होताच डव्हान्स वाटप करून सक्षम यंत्रणा उभी करण्यात येणार आहे.ऊस उत्पादक शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून कारखाना काम करत असून कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त ठेकेदारांनी ऊस तोडणी वाहतुकीचे करार करावेत.असे आवाहन यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमास ग्री मॅनेजर देशमुख,ऊस पुरवठा अधिकारी बी. ई. भोसले, वगरे बी. ए., उस विकास अधिकारी श्री. स्वामी ए. टी. यांच्यासह सर्व शेतकरी उपस्थित होते.

## अकोला येथे युवा प्रतिष्ठान आयोजित राज्यस्तरीय कर्तृत्ववान महिला शिखर पुरस्कार सौ.दिपाली संतोष काटे प्रदान

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**



केज येथील रामकृष्ण परिवाराच्या साधक सौ. दिपालीताई संतोष काटे यांना अकोला येथे युवा प्रतिष्ठान आयोजित राज्यस्तरीय कर्तृत्ववान महिला शिखर पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला या बाबत सविस्तर माहिती अशी की, अकोला येथे सामाजिक, शैक्षणिक,अध्यात्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या अकोला येथील 'युवा विचारपीठ प्रतिष्ठान'च्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी 'राज्यस्तरीय कर्तृत्व शिखर महिला रत्न पुरस्कार २०२६' सन्मान सोहळा अत्यंत उत्साहात आणि दिमाखदार पद्धतीने पार पडला. स्त्रीच्या कर्तृत्वाचा यथोचित सन्मान व्हावा, याउदात्त हेतूने आयोजित या सोहळ्यात विविध क्षेत्रांत ठसा उमटविणाऱ्या ५५ कर्तृत्ववान महिला आणि १५ सामाजिक महिला संस्थांना मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले.या सोहळ्याला प्रमुख पाहुण्यांची उपस्थिती होती.या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून मा. बी.चंद्रकांत रेड्डी अप्पर पोलीसअधीक्षक, अकोलामा. सौ.शारदाताई खेडकर महापौर,अकोला मा.सुरेशराव देवकर संस्थापकअध्यक्ष,अदिती अर्बन,मा.संजयजी रूहाटिया संचालक, कालुराम फूड,मा.सौ. मालतीताई कायटे पोलीस निरीक्षक,मा. प्राचार्य रामेश्वरजी भिसे श्री शिवाजी कॉलेज,मा. प्रा.प्रकाश डवले,मा. कुणाल ढोमणे व्यवस्थापक,पी एन जी ज्वेलर्स,मा.सौ.त्रिवेणी ताई कुणाल घोलप आरटीओ अधिकारी,मा. सौ.अर्चनाताई शर्मा समाजसेविका, मा.सौ. रश्मीताई दीपकखडसान, मा.सौ.ऋतुंबराताई धोत्रे मानसशास्त्रज्ञ, डॉ.प्रवीण अग्रवाल,श्री.सुभाष शेगोकार अधिकारी, सेंट्रल रेल्वे आणि श्री. मनोज देशमुख सर यांची उपस्थिती होती.सौ. दिपालीताई संतोष काटे यांनी कुठलेही प्रशिक्षण न घेता भावार्थ दीपिका ज्ञानेश्वरी या ग्रंथा विषयी विवेचन करीत आहेत. त्या प्रवचनकार तसेच ज्ञानेश्वरी अभ्यासक म्हणून महाराष्ट्रात ज्ञानेश्वरीचा प्रचार व प्रसार करीत आहेत. प.पु.वासुदेवराव खंदारे गुरुजी यांच्या सान्निध्यात त्यांनी अध्ययन केले आहे.प्रत्येक व्याख्यानात विविध प्रकारे ज्ञानेश्वरी ग्रंथावर आपल्या मधुर वाणीमधुन व्याख्यान देत आहेत याबद्दल विविध क्षेत्रातील तज्ज्ञ प्रशिक्षकांनी त्यांची या पुरस्कारासाठी निवड केली आहे.त्यांना 'राज्यस्तरीय कर्तृत्व शिखर महिला रत्न पुरस्कार २०२६' पुरस्कार मिळाल्याबद्दल रामकृष्ण परिवाराच्या वतीने त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

## गांधी तीर्थ राज्यस्तरीय मूल्यांकन समितीने केली साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या उपक्रमांची पाहणी व कौतुक

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

गांधी रिसर्च फाउंडेशन जळगाव यांच्या वतीने दरवर्षी गांधी तीर्थ राज्यस्तरीय स्वच्छ शाळा प्रतियोगिता घेण्यात येते. यानिमित्ताने राज्यातील याप्रतियोगितेत सहभागी शाळांना स्वच्छतेच्या संदर्भात,पर्यावरणाच्या संदर्भा मध्ये,टाकाऊ पासून टिकाऊ,प्लास्टिक मुक्त,वैज्ञानिक दृष्टिकोन जागृत करणारे विविध उपक्रम,वैयक्तिक स्वच्छता,सार्वजनिक स्वच्छता,पथनाट्य, स्वच्छता रॅली,निबंध स्पर्धा,चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा,पोस्टर स्पर्धा अशा विविध स्पर्धा मधून मुलांमध्ये स्वच्छतेचे महत्व पटवून देणे व गांधीजींच्या विचाराची धारा मुलां पर्यंत पोहोचवण्याचे काम उत्कृष्ट रीतीने गांधी तीर्थ राज्यस्तरीय प्रतियोगिता यातून केले जाते.नियोजनाप्रमाणे सहभागी प्रत्येक शाळेने वर्षभर राबवलेल्या उपक्रमाचे व्हिडिओज, फोटो,प्रसार माध्यमे, यातून मुलांमध्ये गांधीजींचे विचार रुजवण्याचा प्रयत्न केला जातो.त्याचबरोबरमोठ्या प्रमाणामध्ये गांधीजींच्या विचारा वरती संपूर्ण महाराष्ट्रात परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांना राज्यस्तर, जिल्हा स्तर,विभाग स्तर, तालुकास्तर यावर प्रथम, द्वितीय,तृतीय अशी बक्षिसे दिली जातात. यातही मोठ्या प्रमाणात या शाळेचे विद्यार्थी सहभागी होतात.मागील दोन वर्ष या शाळेने राज्यस्तरीय प्रतियोगिते मध्ये राज्यातील महसूल विभागातून प्रथम क्रमांक मिळवला होता.सतत दोन्ही वर्ष ५१००० चे प्रथम पारितोषिक प्राप्त केले होते.याही वर्षी वरील प्रमाणे उपक्रम राबवून स्वयं मूल्यमापन करून सदर फाउंडेशन कडे पाठवले होते. राज्यातुन निवडल्या गेलेल्या ४० शाळांमध्ये साने गुरुजी निवासी विद्यालय यांची निवड होऊन राज्यस्तरावरून मूल्यांकन दिनांक २२ एप्रिल २०२६ रोजी झाले.वेस्टेज कागदा पासून कागद निर्मिती, निर्माल्या पासून धूप निर्मिती,गांडूळ खत निर्मिती,पालापाचोळ्या पासून सेंद्रिय खत निर्मिती,प्लास्टिक संकलन व पुन्हा वापरासाठी प्लास्टिक केंद्रावरती पोहोचवणे, टाकाऊ पासून टिकाऊ, नैसर्गिक वस्तूंपासून युरीगो अर्क इ.उपक्रमाचे श्री.गिरीश कुलकर्णी, पाटील सर यांनी भरभरून कौतुक केले. त्याचवेळी भरवलेल्या प्रदर्शनाची देखील त्यांनी पाहणी केली.सर्व शिक्षक व उपस्थिती विद्यार्थी यांच्याशी संवाद साधून स्वच्छतेचे महत्व व गांधीजींचे विचार विशद केले.साने गुरुजी निवासी विद्यालयाने राबवलेल्या या उपक्रमाचे कमिटीने भरभरून कौतुक केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.



## आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके यांचा २५ एप्रिल रोजी गडचिरोली दौऱ्यावर

**दैनिक वादळ वार्ता**
**गडचिरोली । प्रतिनिधी**



आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांचा दिनांक २५ एप्रिल रोजी गडचिरोली येथे दौऱ्यावर येत असून या दौऱ्यादरम्यान ते शासकीय आश्रमशाळांतील नव्याने प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या वाढ विण्यासंदर्भातील उपाययोजनांवरील कार्यशाळेला उपस्थित राहणार आहेत. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात धान खरेदीच्या अनुषंगाने आढावा बैठकही घेण्यात येणार आहे.

दौरा कार्यक्रमानुसार, शनिवार दिनांक २५ एप्रिल रोजी सकाळी ८.३० वाजता शासकीय विश्रामगृह, गडचिरोली येथे आगमन व राखीव. त्यानंतर सकाळी ९ वाजता शासकीय आश्रमशाळांतील नव्याने प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्याच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांबाबत आयोजित कार्यशाळेत महाराजा सेलिब्रेशन हॉल, धानोरा रोड, गडचिरोली येथे उपस्थित. दुपारी १२.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली येथे धान खरेदीच्या अनुषंगाने आढावा बैठकीस उपस्थित. सायंकाळी सोयीनुसार यवतमाळकडे प्रयाण.

## केंद्रीय मुख्याध्यापक सूर्यकांत काळे यांचा सेवागौरव सोहळा

### खा.सोनवणे यांच्या हस्ते सन्मान होणार; प्रकाश बोधले महाराज यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**



प्राथमिक शिक्षण चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते तथा साळेगाव येथील जिल्हा परिषद प्रशालेतील केंद्रीय मुख्याध्यापक सूर्यकांत तुकाराम काळे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार सोहळयाचे आयोजन येत्या शनिवारी (दि.२५) करण्यात आले आहे. बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांच्या हस्ते हा गौरव सोहळा होणार आहे.गेल्या ३५ वर्षापासून सुर्यकांत काळे हे जिल्हा परिषदतंर्गत कार्यरत आहेत. त्यांच्या सेवापूतीनिमित्त येत्या शनिवारी (दि.२५) सकाळी ११ वाजता निसर्ग मंगल कार्यालय येथे हा कार्यक्रम होणार आहे. केजचे गटशिक्षणधिकारी सुनील केंद्रे अध्यक्षस्थानी राहणार आहेत. हभप प्रकाश बोधले महाराज, गणेश जोगदंड महाराज यांचे शुभाशीर्वाद या सोहळ्यास लाभणार आहेत. या कार्यक्रमास आ.कैलास पाटील, माजी मा.राजेंद्र राऊत, अंबासाखरचे चेअरमन रमेशराव आडसकर, माजी आ.संगीता ठोबरे, माजी आ.पृथ्वीराज साठे, आरोग्य संचालक डॉ.अशोक थोरात, सोलापूर जि.प.अध्यक्ष दीपक वैद्य, सभापती अंकुशराव इंगळे, माजी शिक्षण सभापती राजेसाहेब देशमुख, माजी पंस सभापती राजेसाहेब देशमुख, ज्ञानेश्वर चवरे, संजय पाटील, अनुराधा नखाते, सीता बनसोड, हारुण इनामदार, सादिक इनामदार, नबाब इमाम, डॉ.देवेंद्र डोके भिमराव साठे, बालासाहेब बोराडे, बालासाहेब जाधव, बाळकृष्ण भवर, भगवान केदार, गुणवंत पवार, सरपंच कैलास पाटील, भालचंद्र गिते, सविता सरवदे, नारायण लांडगे, 'छावा'चे जिल्हाध्यक्ष शिवाजी ठोंबरे आदीची प्रमुख उपस्थिती राहणार आहेत. यावेळी सूर्यकांत व सुरेखा काळे यांचा गौरव करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन साळेगाव ग्रामस्थ, जिल्हा परिषद शाळेतील सर्व शिक्षक व मित्र परिवाराच्यावतीने करण्यत आले आहे.

## माजलगावात गायत्रीताई रामटेके यांचा ‘मी रमाई बोलतेय’ एकपात्री प्रयोग

### हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे–बहुजन विकास मोर्चा

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव । प्रतिनिधी**



समाज प्रबोधनाचा प्रभावी संदेश देणारा ‘मी रमाई बोलतेय’ हा एक पात्री प्रयोग नागपूरच्या सुप्रसिद्ध कलावंत अभिनेत्री गायत्रीताई रामटेके यांच्या सादरी करणातून २७ एप्रिल रोजी माजलगावात आयोजित करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास नागरिकांनी जुना मोंढा मैदान येथे हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन बहुजन विकास मोर्चाच्या वतीने करण्यात आले आहे.

आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान बाबुराव पोटभरे भूषवणार असुन, उद्घाटक ज्येष्ठ नेते दयानंद स्वामी राहणार आहेत. तर पो.नि. राहुल सूर्यतळ, रिपाई तालुका अध्यक्ष अविनाश जावळे, वंचितचे अंकुश जाधव यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील संघर्षमय प्रवासात खंबीर साथ देणाऱ्या रमाईंच्या त्याग, समर्पण आणि कर्तृत्वाची जिवंत मांडणी या प्रयोगातून करण्यात येणार आहे. गायत्रीताई रामटेके यांच्या प्रभावी अभिनयातून रमाईंचे जीवन प्रेक्षकांसमोर जिवंत होणार आहे. आपल्या उत्कृष्ट अभिनयातून क्रांतिज्योती सावित्रीमाई, त्यागमूर्ती माता रमाई आणि राजमाता जिजाऊ साहेबांचा इतिहास जिवंत करणाऱ्या एक प्रगल्भ अभिनेत्री म्हणून त्यांनी आज आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. कोणतीही व्यावसायिक अपेक्षा न ठेवता, समाजाप्रती असलेले देणे फेडण्यासाठी त्यांनी सुरू केलेला हा एकपात्री प्रयोगाचा प्रवास आज सातासमुद्रापार पोहोचला आहे.

हा प्रयोग समाज मनाला स्पर्श करणारा ठरणार आहे. समाजात जागृती निर्माण करण्यासाठी तसेच नव्या पिढीला इतिहासाची जाणीव करून देण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे आयोजकांनी नमूद केले. त्यामुळे २७ एप्रिल रोजी जुना मोंढा मैदान संध्याकाळी ७ वाजता या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहून तो यशस्वी करावा असे आवाहन आयोजक ज्येष्ठ नेते तथा माजी उपनगराध्यक्ष कचरू खळगे, बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी मोरे, विठ्ठल पंडित, निमंत्रक-नवनाथ धायजे, राजेश साळवे, प्रदीप पट्टेकर, शेख बाबा, ॲड.नासेरखान, संयोजक- नगर सेवक अभिजीत पोटभरे, सचिन जावळे, अशोक लांडगे, सदानंद प्रधान यांच्यासह आयोजन समितीचे दीपक टाकणखार, राहुल मस्के, शेख फिरोज आकाश टाकणखार, विजय धायजे, सनी प्रधान, शाहू डोंगरे, सचिन टाकणखार, अभिषेक टाकणखार, बाळू सातपुते, गोटू लांडगे, शिंदे आशुतोष, आकाश घुगे, अक्षय मोरे, समाधान नरवडे, सुशील पोळ, युवराज मिसाळ, विराज आठवे, दीपक शिंदे, केतन प्रधान, दाभाडे बाबासाहेब, भैय्या शिनगारे, संकेत खळगे, ऋषी सोनवणे, रवि,राज सोनवणे, सचिन वैद्य, अजिंक्य वाघमारे, अक्षय राठोड, गायकवाड अमोल, किरण डोंगरे पाटील, संतोष डोंगरेसह बहुजन विकास मोर्चा माजलगाव शहरच्या वतीने केले आहे.

## सफाळे परिसरात गुरांची बेकायदेशीर वाहतूक?

**दैनिक वादळ वार्ता**
**पालघर । प्रतिनिधी**

सफाळे बाजारात २० एप्रिल रोजी पहाटे घडलेल्या हिट अँड रन घटनेतील अज्ञात वाहनाचा अद्याप शोध लागलेला नसून, या संशयास्पद पलायनामुळे गुरांची बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या टोळीवर संशय व्यक्त होत आहे.दरम्यान, या प्रकरणात संभाव्य राजकीय हस्तक्षेपाबाबतही चर्चा रंगू लागली असून, याबाबतची स्पष्ट माहिती पोलीस तपासानंतरच समोर येणार आहे. सोमवारी पहाटे सफाळे बाजार भरलेला असताना अतिवेगाने अज्ञात संशयास्पद वाहन जेष्ठ नागरिकांना व वाहनांना धडक देत पसार झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

# गायरान जमीन हस्तांतरण प्रक्रिया १५ मे पर्यंत पुर्ण करा-विभागीय आयुक्त जी.श्रीकांत

**दैनिक वादळ वार्ता**
**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदींनुसार शासकीय जमिनीवरील ०१ जानेवारी २०११ पर्यंतची निवासी अतिक्रमणे नियमित करण्याबाबत २५ मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णयाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी आज व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सर्व जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून आढावा घेतला. गायरान जमीन हस्तांतरण प्रक्रिया १५ मे पर्यंत पुर्ण करा तसेच याकामात कोणत्याही परिस्थितीत विलंब होणार नाही याची दक्षता घ्या, असे निर्देश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी आज दिले.

विभागीय आयक्त कार्यालयात आयोजित बैठकीला अप्पर आयुक्त रिता मेत्रेवार, अप्पर आयुक्त सुषमा देसाई, सहायक आयुक्त शुभांगी आंधळे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त जी.श्रीकांत म्हणाले, आपल्या जिल्ह्यांतील गावनिहाय गायरान जमीनींवरील सन २०११ पर्यंतची निवासी अतिक्रमणे नियमानुसार नियमित करण्यासाठीची कार्यवाही गतीने होण्यासाठी सर्व संबंधित जिल्हाधिकारी यांनी याबाबतचे अधिकारी उपविभागीय अधिकारी यांच्याकडेही द्यावेत. प्रधानमंत्री आवास योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांना घरकुलासाठी जमीन उपलब्ध करून देण्यासाठी स्वराज्य संस्थांना १५ मे पर्यंत जमीन हस्तांतरीत करावी. सदरील १०० टक्के प्रक्रिया कोणत्याही परिस्थितीत १५ मे पर्यंत पुर्ण करावी. या कामकाजाचा विभागीय पातळीवरून दैनंदिन आढावा घेण्यात येईल. या कामाला विलंब होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.



या बैठकीत शासन निर्णयाची अंमलबजावणी, प्रलंबित प्रस्तावांची स्थिती तसेच जिल्हानिहाय प्रगती यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. शासकीय जमिनीवरील पात्र निवासी अतिक्रमणे नियमित करण्याची प्रक्रिया पारदर्शक, जलद आणि नियमानुसार पूर्ण करण्याचे निर्देश विभागीय आयुक्तांनी दिले. नागरिकांना अनावश्यक त्रास होणार नाही याची दक्षता घेऊन सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करा. तहसीलदार तसेच गट विकास अधिकारी यांनी प्रक्रियेला गती देण्यासाठी शिबिरांचे आयोजन करावे तसेच प्राप्त प्रस्तावावर गतीने कार्यवाही करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

सर्वांसाठी घरे या संकल्पनेला गती देण्यासाठी पात्र लाभार्थ्यांना या प्रक्रियेचा जास्तीत जास्त लाभ मिळावा, यासाठी विशेष प्रयत्न करा. गृहनिर्माणाशी संबंधित योजना आणि अतिक्रमण नियमितीकरण प्रक्रिया यामध्ये समन्वय साधून नागरिकांना कायमस्वरूपी निवासाचा हक्क मिळवून देण्यावर भर देण्याची गरज आहे. यासाठी संबंधित यंत्रणांनी दैनंदिन कामकाजात या कामाला प्राधान्य द्यावे. मिशन मोडवर विहित कालमर्यादेत काम पुर्ण करा, असेही ते यावेळी म्हणाले.जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपल्या जिल्ह्यातील कामकाजाचा आढावा सादर केला. प्रलंबित प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढून शासनाच्या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.बैठकीस महसूल, ग्रामविकास तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## हरसद गावचा सुपुत्र प्रल्हाद आलट यांची महाराष्ट्र पोलीस दलात निवड; ग्रामस्थांकडून उत्स्फूर्त सत्कार

**दैनिक वादळ वार्ता**
**लोहा । प्रतिनिधी**

लोहा तालुक्यातील मौजे हरसद येथील शेतकरी कुटुंबातील प्रल्हाद निवृत्ती पाटील आलट यांची महाराष्ट्र पोलीस दलात निवड झाल्याने गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या या यशाबद्दल ग्रामस्थांच्या वतीने नुकताच सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.

या प्रसंगी गावच्या सरपंच सौ. पार्वतीबाई शिवाजी आप्पा जामकर यांच्या हस्ते प्रल्हाद यांचा पुष्पहार व शाल देऊन गौरव करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत सदस्य मारोती पाटील आलट, सटवाजी जामकर, ज्ञानोबा माऊली, काळेश्वर आलट, महेश आलट, आत्माराम जाधव तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.



प्रल्हाद यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही चिकाटी, जिद्द आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांच्या जोरावर हे यश संपादन केले. त्यांच्या या यशामागे आई-वडिलांचे मार्गदर्शन व आशीर्वाद तसेच कुटुंबियांचा पाठिंबा लाभल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

सत्कार सोहळ्यात उपस्थित मान्यवरांनी प्रल्हाद यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देत, त्यांनी गावाचे व जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. त्यांच्या यशामुळे गावातील युवकांमध्येही प्रेरणा निर्माण झाली असून स्पर्धा परीक्षांकडे कल वाढेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला. प्रल्हाद यांच्या यशामुळे त्यांच्या कुटुंबीयांसह संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण असून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## प्रामाणिक प्रयत्न हेच यशाचे सूत्र-डॉ.हनुमंत सौदागर

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनाचे ध्येय निश्चित करून, पुस्तकांशी मैत्री करत सातत्यपूर्ण अभ्यास आणि प्रामाणिक प्रयत्न केल्यास यश निश्चित मिळते, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. हनुमान सौदागर यांनी केले. ते सरस्वती महाविद्यालय, केज अंतर्गत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे आयोजित 'यशस्वी विद्यार्थी गौरव सोहळ्या'प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. किरणकुमार धिमधिमे होते. तर सत्कारमूर्ती म्हणून महाविद्यालयातील विद्यार्थिनी रूपाली चांगदेव नेहरकर हिची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते तिला वृक्षरोप देऊन सन्मानित करण्यात आले. पुढे बोलताना डॉ सौदागर म्हणाले वाचनातून ज्ञानप्राप्ती होते.पुस्तके माणसाला जगायला शिकवतात असे मत व्यक्त केले.



अध्यक्षीय समारोपात उप प्राचार्य डॉ. धिमधिमे यांनी विद्यार्थ्यांना या यशस्वी विद्यार्थ्यांचा आदर्श घेऊन जीवनात पुढे जाण्याचे आवाहन केले. सत्काराला उत्तर देताना रूपाली नेहरकर हिने अपयशानंतरही खचून न जाता जिद्द व चिकाटीने प्रयत्न केल्यास यश निश्चित मिळते, असा आत्मविश्वास व्यक्त केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिंदी विभाग प्रमुख प्रा.डॉ. संतोष मस्के यांनी केले. प्रास्ताविक स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक डॉ. नागेश कराळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. रमेश माने यांनी मानले. कार्यक्रमास प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

## देगलूर महावितरणच्या नवीन विभागीय कार्यालयासाठी १.२६ कोटींचा निधी मंजूर

### आ.जितेश अंतापूरकर यांच्या प्रयत्नास यश

**दैनिक वादळ वार्ता**
**देगलूर । प्रतिनिधी**

देगलूर महावितरण विभागाच्या विकासाला गती देणारा निर्णय अखेर साकार झाला असून महावितरणच्या नवीन विभागीय कार्यालयाच्या स्वतंत्र इमारतीसाठी तब्बल १ कोटी २६ लाख ७८ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निर्णयामुळे देगलूरसह परिसरातील वीज व्यवस्थापन अधिक सक्षम व कार्यक्षम होणार असल्याचे चित्र आहे.देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघाचे आ. जितेश अंतापूरकर यांनी या संदर्भात सातत्याने पाठपुरावा करत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. त्यांच्या या प्रयत्नांना अखेर यश आले असून मुख्यमंत्री फडणवीस यांनी या प्रस्तावाची तात्काळ दखल घेत निधी मंजूर केला आहे.नवीन विभागीय कार्यालयाच्या इमारतीमुळे महावितरणच्या कामकाजाला स्वतंत्र व सुसज्ज सुविधा मिळणार आहेत. यामुळे नागरिकांना वीजसंबंधित सेवा अधिक जलद आणि सुलभ पद्धतीने उपलब्ध होणार आहेत. तसेच, प्रशासनिक कार्यक्षमता वाढून तक्रार निवारण प्रक्रियेलाही गती मिळणार आहे.दरम्यान, मंजूर निधीच्या प्रक्रियेला लवकरच अंतिम स्वरूप दिले जाणार असून प्रत्यक्ष बांधकाम कामालाही लवकरच सुरुवात होणार असल्याची माहिती मिळाली आहे. या निर्णयामुळे देगलूरच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळणार असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.



**आ.अंतापूरकर यांचा डबल धमाका..**

आरोग्य क्षेत्र माझ्या मतदारसंघात भक्कम उभारली पाहीजे सर्वसामान्य नागरीकांना आरोग्य सुविधा सुलभतेने मिळाली पाहीजे यासाठी अविरत पाठपुरावा करुन देगलूरच्या श्रेणीवर्धन दवाखाना बांधकामासाठी आ.अंतापूरकरांनी पाठपुरावा करुन भरीव निधि मंजूर करुन घेतली होती आता महावितरण विभागाचे विभागीय कार्यालय बांधकामासाठी निधि मंजूर करुन आणल्याने आ.अंतापूरकर यांच्या विकासप्रेम वृत्तीचे मतदारसंघात कौतूक होत आहे.

## मोलगीत आमसूल खरेदीला सुरुवात; उत्पादनात घट



**दैनिक वादळ वार्ता**
**मोलगी । प्रतिनिधी**

अक्कलकुवा तालुक्यातील मोलगी येथे आमसूल हंगामाला सुरुवात झाली असून, अवकाळी पावसामुळे यंदा आंब्याच्या कैरी उत्पादनात मोठी घट झाली आहे. मोहर गळती आणि लहान कैऱ्या पडल्याने अपेक्षित उत्पादन मिळणार नसल्याची चिंता शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, मोलगी ही राज्यातील महत्त्वाची आमसूल बाजारपेठ मानली जाते. येथे उत्पादित आमसूलाला देशभरातून मागणी असते. यंदा कमी उत्पादन असले तरी चांगल्या प्रतीच्या आमसुलाला २०० ते २५० रुपये प्रतिकिलो दर मिळत असल्याने काही प्रमाणात दिलासा मिळत आहे.

बाहेर राज्यातील व्यापाऱ्यांनीही खरेदीला सुरुवात केली असून, स्थानिक आदिवासी बांधवांसाठी आमसूल हे महत्त्वाचे उत्पन्नाचे साधन ठरत आहे. मात्र उत्पादन घटल्याने अपेक्षित उत्पन्न मिळण्याबाबत अनिश्चितता कायम आहे.

# पारडी येथे 'सह्याद्री स्पर्धा परीक्षे'चा शैक्षणिक जागर;२ हजार विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

### २.५१ लाखांची बक्षिसे जाहीर; ग्रामीण भागातील प्रतिभेला मिळणार हक्काचे व्यासपीठ

**दैनिक वादळ वार्ता**
**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धेची गोडी निर्माण व्हावी आणि त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव मिळावा, या उदात्त हेतूने लोहा तालुक्यातील पारडी येथे सह्याद्री ग्रुप ऑफ इन्स्टिटयूशन्स' च्या वतीने आयोजित सह्याद्री स्पर्धा परीक्षा व प्रवेश चाचणी २०२६-२७ शुक्रवारी अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. या परीक्षेला लोहा परिसरातील तब्बल २ हजार विद्यार्थ्यांनी हजेरी लावत मोठा प्रतिसाद दिला.

बक्षिसांचा वर्षाव २ लाख ५१ हजारांची पारितोषिके विद्यार्थ्यांच्या परिश्रमाचे चीज व्हावे, यासाठी संस्थेच्या वतीने एकूण २ लाख ५१ हजार रुपयांची भरीव बक्षिसे जाहीर करण्यात आली आहेत. इयत्ता १ ली ते ९ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी तीन गटांत ही परीक्षा घेण्यात आली.

पारितोषिकांचे स्वरूप खालीलप्रमाणे प्रथम पारितोषिक रुपये ३१०००

द्वितीय पारितोषिक २१०००
तृतीय पारितोषिक ११०००
चतुर्थ पारितोषिक ७०००
उत्तेजनार्थ ५०००/-

**तहसीलदारांकडून कौतुक**

परीक्षेदरम्यान लोहा तालुक्याचे तहसीलदार विठ्ठल परळीकर यांनी परीक्षा केंद्राला सदिच्छा भेट देऊन पाहणी केली. ग्रामीण भागात अशा प्रकारच्या स्पर्धा परीक्षांचे आयोजन केल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. विद्यार्थ्यांचा शिस्तबद्ध सहभाग आणि संस्थेचे सुयोग्य नियोजन पाहून त्यांनी संस्थेच्या उपक्रमाचे तोंडभरून कौतुक केले.

खास वैशिष्ट्य सर्व विद्यार्थ्यांना मोफत 'एक्झाम पॅड' केवळ परीक्षाच नाही, तर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांचा विचार करत संस्थेच्या वतीने सहभागी सर्व २०१८ विद्यार्थ्यांना मोफत 'एक्झाम पॅड चे वाटप करण्यात आले. संस्थेच्या या उपक्रमाचे पालकांमधून स्वागत होत आहे.

गुणवंत विद्यार्थ्यांना योग्य दिशा आणि प्रोत्साहन देणे हेच आमच्या संस्थेचे मुख्य ध्येय आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शहराच्या बरोबरीने स्पर्धेत टिकावे, यासाठी आम्ही सदैव कटिबद्ध आहोत सुदर्शन शिंदे (संस्थापक, सह्याद्री ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स)

**नियोजनासाठी चमुचे परिश्रम**

हा शैक्षणिक सोहळा यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक अनिल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली रमाकांत बडे, रुक्मिणी धोंडगे, अर्चना बेळकोणे, नंदकिशोर मेकाले, नेहा जाधव, संतोष पांगरेकर, विष्णू गोंड, अमोल शिरसाठ यांच्यासह सर्व शिक्षक व कर्मचारी वृंदाने अहोरात्र परिश्रम घेतले. या परीक्षेमुळे परिसरात शैक्षणिक चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077